सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



**महत्वाचे...**

## खून प्रकरणात आरोपीस जामीन मंजूर

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

येथील रहिवासी अमृता संदीप शिंदे वय ३५ वर्षे (रा. गरिबी हटाव झोपडपट्टी, सोलापूर) यांना जातीवाचक शिवीगाळ करून खून केल्याप्रकणीच्या गुन्ह्यात अतिरिक्त सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते यांनी आरोपीचा जामीन मंजूर केला. दि.१७/१०/२०२५ रोजी रात्री ११.०० वाजणेच्या सुमारास फिर्यादी प्रतिमा शंके या घरासमोर रस्त्यावर उभ्या असताना त्यांना मोठमोठ्याने भांडण्याचा आवाज येत होता. गरिबी हटाव झोपडपट्टी नं. १ संघर्ष तरुण मंडळाच्या पुढे आरोपी आकाश तुळजाराम, बलरामवाले, नवल करे ,अमृता संदीप शिंदे, लक्ष्मी आकाश बलराम वाले हे फिर्यादीचे पती यतिराज शंके यास हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण करत होते. त्यावेळी आकाश बलरामवाले हा पळून जावून त्याच्या घरातील कुऱ्हाड घेवून आला व यतिराज शंके याचे डोक्यात पाठीमागून कुऱ्हाडीने वार केला, त्यामुळे फिर्यादी यांचे पती यांचा मृत्यू झाला अशा आशयाची फिर्याद मयत यतिराज शंके यांच्या पत्नीने विजापूर नाका पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं.५००/२०२५ अन्वये दाखल केली होती. सदर गुन्ह्यात पोलीसांनी दि.२८/१२/२०२५ रोजी अमृता संदीप शिंदे यांना अटक झाली होती. आरोपीने सोलापूर येथील सत्र न्यायालयात जामीन मिळणे साठी अर्ज दाखल केला होता त्याची सुनावणी अतिरिक्त सत्र न्यायाधीश जयदीप मोहिते सो यांच्या न्यायालयासमोर झाली. सदरकामी फिर्यादीच्या वकिलांनी प्रतिज्ञापत्र दाखल करुन जामीन अर्जास तीव्र विरोध केला होता. तथापि, आरोपीच्या वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून मे न्यायालयाने आरोपीस जामीनावर सोडण्याचा आदेश पारित केला. या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. गुरुदत्त बोरगांवकर, ॲड. विश्वास शिंदे, ॲड. शिवानी करावा, ॲड. निकिता कुलकर्णी यांनी तर सरकारतर्फे ॲड. दत्ता पवार यांनी काम पाहिले.

## प्रेमप्रकरणातून तरुणाने घेतला गळफास

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

प्रेमप्रकरणातून तरुणाने लॉजमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. सोलापूर शहरातील भाग्यलक्ष्मी लॉजमध्ये एका तरुणाने गळफास घेऊन आपले जीवन संपवले. मृत तरुणाचे नाव हरीश भास्कर बंडी वय २९, राहणार नीलम नगर, सोलापूर असे आहे. ही घटना दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौक रस्त्यावरील आंबेसेटर हॉटेलजवळील भाग्यलक्ष्मी लॉज, दुसऱ्या मजल्यावरील रूम क्रमांक १२० येथे सकाळी अकरा वाजेच्या सुमारास उघडकीस आली. नातेवाइकांच्या माहितीनुसार, हरीश बंडी यांचे एका मुलीशी प्रेमसंबंध होते. त्यानंतर घरच्यांनी मुलीच्या घरच्यांकडे लग्नाची मागणी केली होती, परंतु मुलीच्या आई-वडिलांनी नकार दिला. यामुळे हरीश तणावाखाली आला होता. दिनांक ४ फेब्रुवारी २०२० रोजी सायंकाळी तो घरातून बाहेर पडला होता. त्यानंतर एमआयडीसी पोलीस ठाण्यात बेपत्ता तक्रार दाखल करण्यात आली होती. शनिवारी सकाळी लॉजमधील रूममध्ये त्याचा मृतदेह सापडल्याने नातेवाइक आणि परिसरात एकच खळबळ उडाली. मृतदेह शवविच्छेदनासाठी सोलापूर शासकीय रुग्णालयात (सिव्हिल हॉस्पिटल) पाठवण्यात आला आहे. घटनेच्या माहितीवरून नातेवाइक आणि मित्रांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली. नातेवाइकांनी या प्रकरणाची चौकशी व्हावी व दोषींवर कारवाई व्हावी, अशी मागणी केली आहे.

## कुर्डुवाडीत संत नरहरी महाराजांचा पुण्यतिथी सोहळा

**कुर्डुवाडी, दि. ७ फेब्रुवारी-**

श्री संत नरहरी सोनार बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांचा ७४० वा पुण्यतिथी सोहळा भक्तीमय वातावरणात येथील श्री विठ्ठल मंदिर येथे संपन्न झाला. प्रारंभी श्री विठ्ठल-रुक्मिणी व श्री संत शिरोमणी नरहरी महाराज यांच्या प्रतिमेस श्री व सौ. शैलेश शंकर वेदपाठक, श्री व सौ. नितीन जगन्नाथ डहाळे या दाम्पत्यांच्या हस्ते अभिषेक करण्यात आला. सकाळी हभप गणेश महाराज कार्लेकर यांची कीर्तन सेवा झाली. श्रींच्या प्रतिमेवर गुलाल व पुष्पवृष्टी करुन संस्थेचे अध्यक्ष श्री व सौ. मदन मोहन पोतदार व श्री व सौ. आदित्य नितीन डहाळे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. ज्येष्ठ पदाधिकारी शंकर वेदपाठक, मोहन पारखे, राजेंद्र पारखे, संतोष पारखे, अरुण महामुनी, ज्ञानेश्वर दीक्षित, सुभाष वेदपाठक, प्रमोद वेदपाठक यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रात्री ९.३० वाजता श्री विठ्ठल मंदिर भजनी मंडळ कुर्दुवाडी व चौभे पिंपरी, घाटणे येथील महिला भजनी मंडळांचा हरी जागर उपक्रम ठेवण्यात आला होता.

# वीज कर्मचाऱ्यांची जम्बो रॅली; वाहतूक ठप्प

## खासगीकरणाला विरोध; पांजरापोळ चौकात प्रचंड गर्दी, नागरिकांची गैरसोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**

महावितरण (एमएसईबी) कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी सोलापुरात आज मोठ्या प्रमाणावर रॅली काढण्यात आली. निषेधात्मक रॅली शहरातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली. सदरची पांजरपोळ चौकातून मार्गस्थ होत असताना आहे. रॅलीमुळे परिसरात प्रचंड गर्दी झाली होती. त्यामुळे वाहतूक पूर्णतः ठप्प झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दरम्यान, राज्य शासनाच्या धोरणांविरोधात तसेच कर्मचाऱ्यांच्या सेवा-सुविधा, पदोन्नती, वेतनविषयक प्रश्न आणि खासगीकरणाच्या विरोधात ही रॅली काढण्यात आली आहे. सकाळपासूनच शहरातील विविध ठिकाणांहून



महावितरणचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने एकत्र येत रॅलीत सहभागी झाले आहेत. हातात फलक, घोषणा देत कर्मचाऱ्यांनी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

ही रॅली पांजरपोळ चौक, सेंट्रल चौक, स्टेशन रोड आणि आसपासच्या भागात रॅली पोहोचताच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. दुचाकी, चारचाकी वाहनचालक तसेच रिक्षाचालकांना मोठ्या प्रमाणावर अडचणींना सामोरे जावे लागत आहे. काही काळासाठी वाहतूक पूर्णपणे बंद पडल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त करण्यात आली. वाहतूक कोंडीमुळे शाळा, महाविद्यालये, रुग्णालयात जाणाऱ्या नागरिकांचे हाल झाले. रुग्णवाहिकांना मार्ग करून देण्यासाठी पोलिसांना विशेष प्रयत्न करावे लागले.

## सोलापूर-तिरुपती विमानसेवा दृष्टिपथात

### पुण्यात स्लॉट न मिळाल्याने 'स्टार एअर'ची सोलापूरहून उड्डाणाची तयारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूरकरांच्या दीर्घकालीन मागणीला आता प्रत्यक्षात येण्याची चिन्हे दिसू लागली असून, सोलापूर-तिरुपती थेट विमानसेवा सुरू होण्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. पुणे विमानतळावर आवश्यक स्लॉट उपलब्ध न झाल्यामुळे स्टार एअर कंपनीने प्रस्तावित पुणे-सोलापूर-तिरुपती सेवा थेट सोलापूर विमानतळावरून सुरू करण्याची तयारी सुरू केली आहे.

**नाईट लँडिंगची अडचण कायम**

सोलापूर विमानतळावर दिवसा उड्डाण व लँडिंगसाठी कोणतीही अडचण नाही. मात्र, रात्री ७ नंतर नाईट लँडिंगसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने नवीन विमानसेवा सुरू करताना मर्यादा येत आहेत. यासाठी विमानतळ प्रशासनाने नाईट लँडिंगसाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे. मात्र, या विषयावर अद्याप ठोस निर्णय झालेला नाही.

यासंदर्भात स्टार एअरकडून प्राथमिक पातळीवर चाचपणी करण्यात आली असून, कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या नियोजनास दुजोरा दिला आहे. सध्या सोलापूर विमानतळावरून मुंबई व गोवा या दोन शहरांसाठी नियमित विमानसेवा सुरू आहे. मात्र, सोलापूर शहर व जिल्ह्यातून तिरुपतीकडे जाणाऱ्या भाविकांची संख्या मोठी असल्याने, थेट विमानसेवेची मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने होत होती.

तांत्रिक अडचणी तसेच नाईट लँडिंगच्या मर्यादांमुळे ही सेवा आतापर्यंत प्रत्यक्षात येऊ शकली नव्हती. मात्र, या अडचणींवर उपाय शोधत स्टार एअरने सोलापूरहून थेट तिरुपती विमानसेवा सुरू करण्याचे नियोजन आखल्याचे समजते. कंपनीला वरिष्ठ पातळीवर अंतिम मान्यता मिळाल्यानंतर पुढील आठवडाभरात तिकीट बुकिंग सुरू होण्याची शक्यता सूत्रांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

स्टार एअरच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सोलापूरकरांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून ही सेवा शक्य तितक्या लवकर सुरू करण्याचा प्रयत्न केला जात आहे. मात्र, बुकिंगची अधिकृत तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही.

## भीमा नदीत ४४०० क्युसेकचा विसर्ग सुरु

### नदीद्वारे पाणी १५ फेब्रुवारीपर्यंत तर शेतीचे आवर्तन २८ फेब्रुवारीपर्यंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.७ फेब्रुवारी-**

उजनी धरणात सध्या समाधानकारक पाणीसाठा असून धरणात ११३ टीएमसी पाणी उपलब्ध आहे. यामुळे भीमा नदीत ४४०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असून, धरणावरील वीजनिर्मिती प्रकल्पासाठीही १६०० क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. याशिवाय डावे व उजवे कालवे, उपसा सिंचन योजना आणि बोगद्यातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून ७० क्युसेक, दहिगाव उपसा सिंचन योजनेतून ८० क्युसेक, तर बोगद्यातून ४०० क्युसेक पाणी सोडण्यात आले आहे. उजनीच्या डाव्या व उजव्या कालव्यातून एकूण २१०० क्युसेक पाणी शेतीसाठी वितरित केले जात आहे. भीमा नदीतील हा विसर्ग १५ फेब्रुवारीपर्यंत, तर कालव्यांमधील पाणी २८ फेब्रुवारीपर्यंत

**उजनी धरणाची सद्य:स्थिती**

एकूण पाणी - ११३ टीएमसी
उपयुक्त पाणीसाठा - ४९.२० टीएमसी
पाण्याची टक्केवारी - ९२ टक्के
कालव्यातून सोडलेले पाणी - २१०० क्युसेक
नदीतून सोडलेले पाणी - ४४०० क्युसेक



सुरू राहणार आहे.

रब्बी पिकांसाठी पहिले आवर्तन १७ जानेवारीपासून सुरू करण्यात आले होते. त्यानंतर नदीतूनही पाणी सोडण्याची मागणी वाढल्याने गुरुवारपासून (दि. ५) भीमा नदीत विसर्ग सुरू करण्यात आला. याचा लाभ पंढरपूर, सांगोला, मंगळवेढा व अक्कलकोट तालुक्यांतील शेतकरी तसेच गावांना होणार आहे. याच पाण्यामुळे सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणारा औज बंधाराही भरला जाणार आहे. लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, यंदाच्या उन्हाळ्यात शेतीसाठी दोन आवर्तने देण्याचे नियोजन असून, पुढील आवर्तन मार्चअखेर तर तिसरे आवर्तन एप्रिलअखेर सोडण्याचा विचार आहे. जिल्हा परिषद निवडणुकांची आचारसंहिता संपल्यानंतर फेब्रुवारी अखेर कालवा सल्लागार समितीची बैठक घेऊन अंतिम नियोजनास मंजुरी दिली जाईल. समांतर जलवाहिनी कार्यान्वित झाल्याने सोलापूर शहराला आता थेट जलवाहिनीतून पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे भीमा नदीतून शहरासाठी स्वतंत्र पाणी सोडण्याची गरज राहिलेली नाही. मात्र, शेतकरी व गावांच्या मागणीवरून नदीत सोडलेल्या पाण्यामुळे औज बंधारा आपोआप भरणार असून, यासाठी महापालिकेला जलसंपदा विभागाला कोणताही खर्च करावा लागणार नाही.

## रस्ता नव्हे...फक्त खड्डेच खड्डे; अपघातांना मिळते आमंत्रण

### बोरामणी नाका ते हैदराबाद रोड मार्ग धोकादायक, तातडीच्या दुरुस्तीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरातील प्रमुख रस्ता सध्या अक्षरशः खड्ड्यांच्या गर्तेत सापडला असून, या मार्गावरून वाहन चालवणे जीवघेणे ठरत आहे. बोरामणी नाका, रिंग रोड ते हैदराबाद रोड या महत्त्वाच्या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने वाहनचालकांसह स्थानिक नागरिकांची गंभीर गैरसोय होत आहे. या रस्त्याची अवस्था अधिकच बिकट झाली असून, अपघातांचा धोका वाढला आहे.

सोलापूर शहराला जोडणारा एक महत्त्वाचा हा रस्ता असून, दररोज शेकडो जड वाहने, ट्रक, कंटेनर तसेच मालवाहू वाहनांची

स्थानिक व्यापारी, शेतकरी व रहिवाशांनी प्रशासनाकडे तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. किमान खड्डे बुजवून रस्ता तात्पुरता तरी सुरक्षित करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अन्यथा एखादा गंभीर अपघात घडल्यानंतरच प्रशासन जागे होईल, अशी भीती नागरिकांमध्ये आहे.

या मार्गावरून ये-जा सुरू असते. कृषी उत्पन्न बाजार समितीत येणारा शेतमाल, भाजीपाला, धान्य वाहतूक याच रस्त्याने होत असल्याने हा मार्ग नेहमीच गजबजलेला असतो. त्यातच शहरात ये-जा करण्यासाठी मोठ्या प्रमाणात दुचाकी व चारचाकी वाहनचालक या रस्त्याचा



वापर करतात.

मात्र, रस्त्यावर पडलेल्या खोल खड्ड्यांमुळे वाहनांचे नियंत्रण सुटण्याचे प्रकार वारंवार घडत आहेत. दुचाकीस्वारांना अचानक ब्रेक मारावा लागत असल्याने मागून येणाऱ्या वाहनांशी धडक होण्याचा धोका वाढला आहे. रात्रीच्या वेळी किंवा धुक्याच्या परिस्थितीत खड्डे दिसत नसल्याने अपघातांची शक्यता अधिक असते. काही दिवसांपूर्वी या मार्गावर किरकोळ अपघात घडल्याचे स्थानिक नागरिक सांगतात.या मार्गावर वाहतूक पोलीस व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

सोलापूर शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याचे मत सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे. प्रशासनाने लवकरात लवकर पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

## पटसंख्या १०० ओलांडलेल्या शाळांना तीन अंशकालीन निदेशकांची संधी

### शाळा व्यवस्थापन समितीला पूर्ण अधिकार; सहावी ते आठवीसाठी अट लागू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद, महापालिका व नगरपालिकेच्या शाळांमध्ये पटसंख्या वाढीस चालना देण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. इयत्ता सहावी ते आठवी किंवा सातवीपर्यंत असलेल्या शाळांमध्ये सहावी-सातवीचा पट १०० किंवा त्याहून अधिक असल्यास त्या शाळांमध्ये अंशकालीन निदेशकांची नेमणूक करता येणार आहे. दि.२३ ऑक्टोबर २०२५ रोजी निश्चित झालेल्या पटसंख्येच्या आधारे हा निर्णय लागू होणार आहे.

या निकषात बसणाऱ्या शाळांमध्ये कला, क्रीडा आणि कार्यानुभव या तीन विषयांसाठी प्रत्येकी एक अशा तीन अंशकालीन निदेशकांची नेमणूक करता येणार आहे. यासाठी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक जाहिरात प्रसिद्ध करतील. प्राप्त अर्जांची छाननी व पडताळणी केंद्रप्रमुखांकडून केली जाईल. त्यानंतर पात्र उमेदवारांची निवड करण्याचे सर्व अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहेत.

निवड झाल्यानंतर शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून नियुक्ती करण्यात येईल. शासन मान्यतेनंतर गटशिक्षणाधिकारी नियुक्ती आदेश देतील. त्यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांमार्फत संबंधित निदेशकांची नावे शासनाकडे पाठविली जातील आणि त्यांचे मानधन सुरू होईल.अंशकालीन निदेशकांना दरमहा ४८ तासांसाठी १२ हजार रुपयांचे मानधन दिले जाते. ४८ तासांपेक्षा जास्त काम केल्यास प्रत्येक अतिरिक्त तासासाठी २०० रुपये दिले जातील. मात्र, हे मानधन कमाल १८ हजार रुपयांच्या मर्यादेत राहणार आहे. दरमहा वेळेवर मानधन मिळत नसल्याची तक्रार अनेक निदेशकांकडून करण्यात येत आहे.

प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी सांगितले की, शासनाच्या निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये अंशकालीन निदेशक नेमण्याचे पूर्ण अधिकार शाळा व्यवस्थापन समितीला देण्यात आले आहेत. भविष्यात पटसंख्या वाढणाऱ्या शाळांमध्ये अशा निदेशकांची संख्या आणखी वाढण्यास साहाय्य ठरणार आहे.

## उच्च शिक्षण विभागाचा अजब कारभार

**वेतन सातव्या आयोगाचे तर रजा रोखीकरण सहाव्याप्रमाणे**

**विभागीय सहसंचालक कार्यालयांची मनमानी; शिक्षकेतर कर्मचारी आणि प्राचार्यांवर अन्याय**

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच विद्यापीठ आणि अनुदानित महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनासह सर्व अनुषंगिक आर्थिक लाभ लागू होणे बंधनकारक आहे. मात्र, उच्च शिक्षण विभागाच्या विभागीय व लेखाधिकारी कार्यालयामधील समन्वयाअभावी आणि वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांच्या मनमानी अर्थबोधामुळे कर्मचाऱ्यांना अनेक लाभांपासून वंचित राहावे लागत आहे. विशेषतः सोलापूर विभागात वेतनाबाबत मोठी विसंगती समोर आली आहे.

तोंडी सूचनांचा मनमानी कारभार

राज्यातील विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू झाला आहे. या नियमानुसार, उन्हाळी व हिवाळी सुट्टी नसलेल्या कर्मचाऱ्यांना आणि प्राचार्यांना निवृत्तीनंतर त्यांच्या खात्यावर शिल्लक असलेल्या जास्तीत जास्त ३०० दिवसांच्या अर्जित रजेचे रोखीकरण मिळणे अपेक्षित आहे. मात्र, गेल्या एक वर्षापासून सोलापूर विभागीय सहसंचालक कार्यालयाने हे प्रस्ताव 'सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे' पाठवण्याच्या तोंडी सूचना दिल्या आहेत. वेतन सातव्या आयोगाप्रमाणे आणि रजा रोखीकरण मात्र सहाव्या आयोगाप्रमाणे, अशा विचित्र पेचामुळे निवृत्त कर्मचारी आणि प्राचार्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

**समन्वयाची गरज**

राज्यातील १० विभागीय सहसंचालक आणि लेखाधिकारी कार्यालयामध्ये कोणत्याही एका आर्थिक निर्णयावर एकमत नसते. एका विभागात निर्णय लागू होतो, तर दुसऱ्या विभागात तो नाकारला जातो. ही विसंगती दूर करण्यासाठी उच्च शिक्षण संचालक किंवा सचिवांनी सर्व विभागांमध्ये समन्वय राखण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**तरुण भारतचे आहे लक्ष! भाग ४**

### याबाबत स्वतंत्र शासन निर्णय उपलब्ध नाही

या विसंगतीबाबत विचारणा केली असता, याबाबतचा स्वतंत्र शासन निर्णय उपलब्ध नाही, असे उत्तर प्रशासनाकडून दिले जाते. जर शासन निर्णय नाही, तर २०१६ ते २०२४ या काळात निवृत्त झालेल्या कर्मचारी व प्राचार्यांना सातव्या आयोगाप्रमाणे लाभ कसे मिळाले? या प्रश्नावर, ते माझ्या आधीच्या सहसंचालकांनी मंजूर केले, असे उत्तर विद्यमान सहसंचालकांकडून दिले जात आहे. सहसंचालक बदलले की नियम बदलतात का, असा संतप्त सवाल प्राचार्य संघटना व कर्मचारी संघटना विचारत आहेत.

### लघुलेखक आणि प्रयोगशाळा सहाय्यकांवरही अन्याय

केवळ रजा रोखीकरणच नव्हे, तर इतर पदांच्या वेतनश्रेणीतही मोठी तफावत आहे: लघुलेखक (Steno): राज्यातील शासकीय कर्मचारी आणि विद्यापीठातील उच्च श्रेणी लघुलेखकांना (४४,९०० - १,४२,४००) व निम्न श्रेणी लघुलेखकांना (४१,८०० - १,३२,३००) ही वेतनश्रेणी लागू आहे. मात्र, महाविद्यालयीन लघुलेखकांना या लाभापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले आहे.

प्रयोगशाळा सहाय्यक: आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत प्रयोगशाळा सहाय्यकांना १ जानेवारी २००६ पासून २४०० ऐवजी २००० ग्रेड पे देऊन त्यांच्यावर अन्याय केला जात आहे. याप्रकरणी न्यायालयाचे स्पष्ट आदेश असतानाही, विविध विभागांमध्ये अंमलबजावणीबाबत कमालीची विसंगती आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३५०

**मने मन चोरी मनोमय धरी ।**
**कुंडली आधारी सहस्त्रकारी ।।**

आपल्या देहातील दहा इंद्रियांनाही मन वरचढ ठरते. आपण ह्या मनाला नियंत्रित करू शकलो नाही तर पाच ज्ञानेद्रीय व पाच कर्मेंद्रियांना, अशा दहा इद्रीयांना मन त्याला वाट्टेल ती दिशेने नेऊ शकते. असे असले तरी मनाला नियंत्रित करण्याचे ठरवले आणि त्याप्रमाणे ठामपणे सातत्य ठेवून वागत राहिले तर असे चंचल व शक्तिशाली मन नियंत्रित होऊ शकते. मनाला स्वतः



च्या नियंत्रणात ठेवणाऱ्या संतांनी मन आपल्या अधीन करण्याचा, त्याला योग्य ती दिशा दाखवण्याचा मार्ग आपणासाठी स्वानुभवातून सांगून ठेवला आहे. मनाला नियंत्रित केल्याशिवाय मानवी जीवनाचा खरा आनंद मिळत नाही. मानवी जीवनाचे महत्व कळण्यासाठी सुद्धा मन नियंत्रित असणे व मनाने योग्य दिशेने वाटचाल करणे आवश्यक आहे. मनच मनाची चोरी करते, मनच मनाच्या ठरवण्यावर अवलंबून आहे. मनाच्या जागृकतेमुळे आत्मज्ञान होऊ शकते, कुंडलिनीहीजागृत होऊ शकते. एवढ्या मोठ्या मानवी देहाला योग्य, अयोग्य दिशा दाखवणाऱ्या इंद्रियांना अधीन करणाऱ्या मनाला मनाच्या आधारे नियंत्रित करता येऊ शकते. मन नियंत्रित झाले तर अवघडही साध्य होऊ शकते. या अनुषंगाने मुक्ताई,

**मनें मन चोरी मनोमय धरी ।**
**कुंडली आधारी सहस्त्रकारी ।।**

असे म्हणतात. अपेक्षित साध्य करायचे असेल, स्वतःचा खरा परिचय करून घ्यायचा असेल तर मनाला स्थिर केलेच पाहिजे, असे मुक्ताई बंधू श्री ज्ञानदेव, तरी मना या बाहेरिलीकडे श्र यावयाची साविया सवे मोडे श्र हे हृदयाचिया डोही बुडे श्र तैसे कीजे श्रश्र असे म्हणतात. मन आपणाला जुमानणारे नसतेच तर अनेकांना त्याला स्थिर करता आले नसते. अर्थात, प्रयत्नाअंती अनेकांनी त्यांचे मन स्थिर केले आहे. यात प्रामुख्याने सात्विक लोकांचा, संतांचा क्रमांक लागतो. कोणीतरी यावे आणि या बेलगाम मनाला आपणास आवरून द्यावे, अशी अपेक्षा करणे चुकीचे असते. कारण मन हे आपले आहे, त्यामुळे त्याला नियंत्रित करण्याची जबाबदारीसुद्धा आपलीच असणार आहे. सकारात्मक विचार, मर्यादित अपेक्षा, इर्षा, द्वेष, क्रोधावर नियंत्रण, या बाबी मनावर नियंत्रण आणण्यास मदत करतात. असे अनेक घटक, अनेक मार्ग असले तरीही, प्रामुख्याने त्याला नियंत्रित करण्यासाठीचा आपला दृढ निश्चय हा फार महत्वाचा ठरतो. आपला दृढनिश्चयच मन नियंत्रित करण्यासाठीचा आधारस्तंभ होय. आपले जीवन अत्यंत महत्वपूर्ण व सुरेख आहे. याला सजवणे, चांगले ठेवणे, आनंदी राहणे, हे आपल्या हाती आहे. बाह्य परिस्थिती कितीही बिकट असली तरीही त्यावर मात करून मन आनंदी राहू शकते. आपले अनेक देशप्रेमी तुरुंगातही व फासावरही शांतपणे गेल्याचे आपण पाहतो. त्यांच्याएवढी कठीण परिस्थिती तर आपल्यासमोर नसते. त्यामुळे दृढनिश्चयाने मनाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न करीत राहणे योग्य असते.जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार,**
**दि. ८ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ सप्तमी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- पुष्य(२३.५८)**
**योग - प्रिती (१०.१८)**
**करण - विष्टी (१६.४३)**
**राहू काल :**
**रविवार**
**दु.४.३० ते ६.००**

**दिनविशेष :**
**श्री गजानन महाराज प्रकट दिन.**
**१९३१: महादेव विठ्ठल काळे यांनी आत्मोद्धार नावाचे पाक्षिक सुरू केले.**
**१९३६: १६ सप्टेंबर १९३५ रोजी नोंदणी झालेल्या बँक ऑफ महाराष्ट्र चे कामकाज सुरू झाले.**
**१९४२: दुसरे महायुद्ध - जपानने सिंगापूर ताब्यात घेतले.**

# 'शक्तिपीठ'चा आराखडा बदलला; लांबीसह खर्चात मोठी वाढ

## महामार्ग ८०२ ऐवजी ८५६ किमी; खर्च एक लाख कोटींच्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

राज्यातील साडेतीन शक्तिपीठांना जोडण्यासाठी प्रस्तावित असलेल्या शक्तिपीठ महामार्गाच्या आराखड्यात मोठे बदल करण्यात आले असून, त्यामुळे या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची लांबी व खर्च दोन्ही लक्षणीयरीत्या वाढले आहेत. पूर्वी ८०२ किलोमीटर लांबीचा असलेला हा महामार्ग आता सुमारे ८५६ किलोमीटर लांबीचा होणार आहे. तसेच, प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या गावांची संख्याही ३५० वरून सुमारे ३९५ गावांपर्यंत वाढली आहे.

आराखड्यातील या बदलांचा थेट परिणाम प्रकल्पाच्या खर्चावर झाला असून, आधी अंदाजे ८६ हजार कोटी रुपये असलेला खर्च आता एक लाख एक हजार कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यांतून तीव्र विरोध झाल्यानंतर राज्य सरकारने शक्तिपीठ महामार्गाच्या मार्गाचा पुनर्विचार करण्याचा निर्णय घेतला.

नागपूर-रत्नागिरी महामार्गाला समांतर आणि दहा किलोमीटरच्या आत जाणाऱ्या या महामार्गामुळे शेती, गावे व स्थानिक जीवनमानावर मोठा परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

ते सिंधुदुर्गदरम्यानच्या शेतकऱ्यांनी आंदोलन छेडल्यानंतर अखेर शासनाने या विषयाची दखल घेत मार्गात बदल केले.

### भूसंपादनाचा व्याप वाढणार

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) तयार केलेल्या सुधारित आराखड्यानुसार, या महामार्गामुळे बाधित १२ पैकी पाच जिल्ह्यांत मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. परिणामी, भूसंपादनाचा व्याप वाढून सुमारे ८ हजार ५०० हेक्टर जमीन संपादित करावी लागणार आहे. या भूसंपादनाचा संपूर्ण खर्च राज्य सरकार उचलणार असून, त्यासाठी कर्ज उभारणीची तयारी सुरू आहे. सध्या हा सुधारित प्रस्ताव बांधकाम विभागाकडे तपासणीसाठी असून, अंतिम मंजुरीनंतर भूसंपादन व प्रत्यक्ष कामाला गती दिली जाणार आहे.




नव्या आराखड्यात १३ जिल्ह्यांचा समावेश सुधारित आराखड्यानुसार शक्तिपीठ महामार्ग आता यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, लातूर, बीड, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग अशा एकूण १३ जिल्ह्यांतून जाणार आहे. सातारा जिल्ह्यातील माण व खटाव तालुके नव्याने या महामार्गात समाविष्ट करण्यात आले आहेत.सोलापूर जिल्ह्यातही मार्गात बदल करण्यात आला असून, पूर्वी बाधित होणारी ५२ गावे आता ४२ वर आली आहेत. नव्या आराखड्यानुसार उत्तर सोलापूर व सांगोला तालुके वगळण्यात आले असून, माढा आणि माळशिरस तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

# महापौर कोंड्याल यांनी केली डॉ. आंबेडकर उद्यानातील कामांची पाहणी

## माता रमाई आंबेडकर प्रतिमेस पुष्पहार अर्पण; विकास कामांचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सामाजिक जाणीव आणि विकासाचा समतोल साधत सोलापूरचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी आपल्या कार्यकाळाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान भेटीने केली. माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांनी अभिवादन केले. उद्यान परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी करत पुतळा उभारणीच्या कामाचा आढावा घेतला.

काल शुक्रवारी बिनविरोध निवड झाल्यानंतर आज नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी सकाळी थेट न्यू बुधवार पेठेतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानाला भेट दिली. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, नगरसेविका वंदना गायकवाड, नगरसेवक सत्यजित वाघमोडे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अजित गायकवाड तसेच कामगार नेते अशोक जानराव आदी मान्यवर उपस्थित होते.



### नूतन महापौरांचा पहिला दिवस

- पहिल्याच दिवशी डॉ. आंबेडकर उद्यानास भेट
- माता रमाई आंबेडकर प्रतिमेस पुष्पहार अर्पण
- पुतळा उभारणीच्या कामाची पाहणी
- स्वच्छता व सुशोभीकरणाबाबत सूचना
- सार्वजनिक स्वच्छालय उभारणीसाठी निर्देश
- मॉर्निंग ग्रुप नागरिकांशी थेट संवाद

नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी आपल्या कार्यकाळाच्या पहिल्याच दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानास भेट दिली. जयंतीनिमित्त त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांनी कामाची सुरुवात केली. यावेळी उद्यान परिसरात सुरू असलेल्या विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करत दर्जेदार कामाबाबत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. महापौरांनी उद्यानात उपस्थित मॉर्निंग ग्रुपच्या नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

### माता रमाई आंबेडकर यांच्या त्यागाचा आदर्श पुढील पिढीस प्रेरणादायी : कोंड्याल

माता रमाई आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा व त्यागाचा आदर्श पुढील पिढीस प्रेरणादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान हे सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे स्थळ आहे. येथे येणाऱ्या नागरिकांना सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे, असे महापौर कोंड्याल म्हणाले.

# शेतातील वादातून शेतकऱ्यावर लोखंडी रॉडने हल्ला

## सहा जणांविरोधात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**

तालुक्यातील बोरगाव (खुर्द) येथे शेतातील वादातून एका शेतकऱ्यावर लोखंडी रॉड व काठीने मारहाण केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी बार्शी तालुका पोलीस ठाण्यात सहाजणांविरोधात गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेत रामधन आत्माराम जाधवर (वय ४८, व्यवसाय शेती, रा. बोरगाव खुर्द, ता. बार्शी) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बार्शी येथील जगदाळेमामा हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. फिर्यादीत नमूद केल्यानुसार, दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास संशयित आरोपी फिर्यादीच्या घरासमोर आले. 'तू माझ्या शेतातून ट्रॅक्टर का नेलास? तसेच शेतातील पाईपलाईनचे टी-तोंड का फोडले?' असा जाब विचारत वाद घातला. त्यानंतर लोखंडी रॉड व काठीने फिर्यादीला बेदम मारहाण केली. यावेळी शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. याप्रकरणी राहुल दत्तात्रय जाधवर, महेश सूर्यकांत जाधवर, कैलास सूर्यकांत जाधवर, सूर्यकांत दिगंबर जाधवर, मंगल दत्तात्रय जाधवर व सुनीता सूर्यकांत जाधवर (सर्व रा. बोरगाव खुर्द, ता. बार्शी) यांच्याविरोधात बार्शी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# अकलूजमध्ये गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ फेब्रुवारी-**

येथील विजय चौकातील शिवरत्न गणेश उत्सव मंडळ व सेवाभावी संस्थेच्या वतीने श्री गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा शुक्रवार दिनांक ६ रोजी धार्मिक विधिवत व श्री गणेशाच्या जयघोषात संपन्न झाला

श्री गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व त्रिकालवंदनीय श्री सद्गुरु सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते करण्यात आले या सर्व धार्मिक विधीसाठी मंडळाचे अध्यक्ष शिवतेसिंह मोहिते-पाटील व मंडळातील सर्व सदस्य उपस्थितीत होते.



या निमित्ताने जयसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजीतसिंह मोहिते-पाटील, धवलसिंह मोहिते-पाटील, फत्तेसिंह माने-पाटील, स्वयं प्रभादेवी मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील यांनी धार्मिक विधीमध्ये सहभाग घेतला दोन दिवस सुरू असलेल्या या सोहळ्यामध्ये त्यानिमित्त गुरुवारी शोभायात्रा काढण्यात आली. तसेच दुपारी दोन ते पाच या वेळेत गणेश स्तवन, गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नक्षत्र देवतापूजन, नांदीश्राद्ध, वास्तु शुद्धीकरण प्राण शुद्धीकरण, कंकण बंधन, जलाभिषक जलाधिवास, धान्याधिवास, शैय्याधिवास, मुख्य देवता स्थापन, पीठ पूजन व पीठ स्थापन आदी विविध कार्यक्रम झाले आज शुक्रवार दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते १ वा दरम्यान पिठ देवता पूजन, गणेश स्तवन, अग्नी स्थापन, अग्निपूजन, मुख्य देवता पूजन, अभिषेक, वर्णिदान, अग्निहवन मूर्ती संस्कार हवन यासह मुख्यमूर्ती प्रतिष्ठापना व कलशारोहण पूर्णाहूती आधी धार्मिक कार्यक्रम झाले असून दुपारी एक ते चार या वेळात महाआरती व महाप्रसाद वाटप करण्यात आला. परिसरातील पाच हजार भाविकांनी याचा लाभ घेतला.




# ग्लोबल व्हिलेजच्या विद्यार्थ्यांचे अबॅकस स्पर्धेत उल्लेखनीय यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल, बोरामणी येथील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा व नॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. महात्मा गांधींच्या विचारधारेवर आधारित शिक्षणपद्धती असलेल्या या शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर विशेष भर देण्यात येतो. दि. ३१ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेत विद्यार्थ्यांनी मानसिक गणित, एकाग्रता व वेग यांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत प्रज्वल चव्हाण - द्वितीय क्रमांक, मिकाईल दांडू - द्वितीय, स्वरूप भुयार - तृतीय , अमोल झुरळे - तृतीय, माजिद पटेल - तृतीय, काशिनाथ मुडके - चतुर्थ, वेद चव्हाण - चतुर्थ क्रमांक आदर्श राठोड - उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे शिक्षिका नजिया मुल्ला यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. उमाकांत चनशेट्टी तसेच संस्थेच्या सचिवा संगिता शहा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# शासकीय चित्रकला ग्रेड स्पर्धेत युनिक स्कूलचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

डी.एस.टी.एस. मंडल संचलित युनिक इंग्लिश मिडीयम स्कूलने एलिमेंट्री व इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला ग्रेड स्पर्धेत यश संपादन केले. विद्यार्थ्यांनी आपले वर्चस्व कायम राखत शंभर टक्के निकालाची परंपरा यंदाही जोपासली आहे.

या शासकीय चित्रकला ग्रेड स्पर्धेत २०२५-२६ या वर्षी ३४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले व शाळेचा १०० टक्के निकाल लागला. या चित्रकला स्पर्धेत ए श्रेणीमध्ये ०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एलिमेंट्री परीक्षेत ईशान्वी नरके, उत्तरकर स्वामिनी, बागलकोटी परी तसेच इंटरमीडिएट परीक्षेत, संगमेश्वर गुड्ड तसेच बी श्रेणीमध्ये २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले.संस्थेच्या संस्थापक राजशेखर शिवदारे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

डी.एस.टी.एस मंडळाचे चे सर्व पदाधिकारी शेटे, अंजली तिवारी, शुभदा उपासे, पूजा बाजपेयी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना शाळेच्या चित्रकला शिक्षिका अनुश्री कोळी यांचे मार्गदर्शन लाभले.

# विनयभंग प्रकरणी साध्या कारावासाची शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**


येथील महिलेचा विनयभंग केल्याच्या गुन्ह्यात आरोपी अनिल नीलकंठ हावळे यास न्यायालयाने दिवशी ठरविले त्यास एक वर्ष साध्या करावासाची शिक्षा व पाच हजाराचा दंड ठरवण्यात आला. दंड न भरल्यास त्याला तीन महिन्यांचा साधा कारावास भोगावा लागेल असे शिक्षा न्यायाधीश विनायक रेडकर यांनी सुनावली.

१२ जानेवारी २०२२ रोजी पिडीता सोलापुरातील शेळगी येथील बलदवा नगर येथील मंदिरात गुरुपौर्णिमेसाठी शिधा द्यायला गेली होती, त्यावेळी मंदिराजवळील अनिल हावळे यांनी तिला घरात कोणी नसताना देवाच्या पाया पडण्यासाठी व प्रसाद देण्यासाठी बोलावून घेतले, त्यावेळी तिचा विनय बंद केला. त्यानंतर पीडितेने त्याच्याविरुद्ध जोडभावी पेठ पोलिसात धाव घेतली. या प्रकरणात सरकारी वकील संदीप फरांदे यांनी सरकारतर्फे युक्तिवाद केला.

# गजानन महाराज प्रकट दिन; आज विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

संत श्री गजानन महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त गुरुमाऊली सेवा संघाच्यावतीने गुलाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम उद्या (रविवारी)दुपारी १२ वाजता तुळजापूर वेस येथील श्री नगरेश्वर मंदिरात होणार आहे.



शेगावी माघमासी वद्य सप्तमी या पावन दिवशी संत गजानन महाराजांचा प्रकट दिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून भाविकांसाठी पारंपरिक गुलाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमानंतर महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गुरुमाऊली सेवा संघाच्यावतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक ९८९०५२०९१२ वर संपर्क साधावा, असे आवाहन संयोजक ज्योतिषाचार्य महेश ओव्हाळ यांनी केले आहे.



# महानगरपालिकेच्या वतीने माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने सामाजिक समता, महिला सक्षमीकरण व त्यागाचे प्रतीक असलेल्या माता रमाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर कार्यालयामध्ये आज नूतन महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, नगरसेविका वंदना गायकवाड, नगरसेवक सत्यजीत वाघमोडे, महेश देवकर, पर्यावरण दूत डॉ. मनोज देवकर, भाजपा महिला सरचिटणीस श्वेता वनमाने, कामगार नेते बापू सदाफुले, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजितकुमार खानसोळे, चंद्रकांत दोन्तुल , लिपिक गणेश कोळी, यलपा पुजारी, अशोक खडके यांच्यासह महानगरपालिकेचे याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी माता रमाई आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा व त्यांच्या जीवनातील त्याग, संघर्ष व समतेच्या मूल्यांचा गौरव केला. माता रमाई आंबेडकर यांनी समाजातील दुर्बल घटकांच्या उत्थानासाठी दिलेले योगदान सदैव प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी व्यक्त केले.



# शिवदारे कॉलेज येथे प्राचार्य नरेश बदनोरे यांचे महात्मा गांधींवर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

येथील व्ही. जी. शिवदारे कॉलेज येथे वाणिज्य विभाग, रा.से.यो. विभाग व गांधी व्हिजन फीचर्स सोलापूरतर्फे महात्मा गांधी स्मृतिदिनानिमित्त प्राचार्य नरेश बदनोरे यांचे व्याख्यान संपन्न झाले. महात्मा गांधी यांचे सर्वकालीन व वैश्विक महत्त्व स्पष्ट करीत प्राचार्य बदनोरे यांनी महात्मा गांधींच्या व्यक्तिमत्वावर विविध दृष्टिकोनातून विस्ताराने प्रकाश टाकला व अनेक प्रसंगातून महात्मा गांधींचे विविधांगी कार्य स्पष्ट केले. प्राचार्य सुत्रावे यांनी अध्यक्षीय विचार व्यक्त केले. व्हिजनचे अध्यक्ष प्राचार्य सुभाष शास्त्री यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य गंगाधर घोंगडे यांनी बदनोरे सरांचा परिचय करून दिला. डॉ. अमिता जावळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्राचार्य एम. बी. पाटील, प्रा. वसंत मणूरे रा.से.यो अधिकारी प्रा. वैशाली वर्हाडे यांनी कार्यक्रमाच्या सफलतेसाठी विशेष परिश्रम घेतले. महात्मा गांधी परिश्रम व्हिजनचे सचिव सुनील व्हसाळे यांनी आभार मानले. प्राध्यापक प्रशांत मेहता, महावीर दुरुगकर उपस्थित होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



महत्वाचे...



## महाराष्ट्र पेन्शनर असोसिएशनतर्फे उत्तम पोतदार यांना पुरस्कार

**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**

महाराष्ट्र पेन्शनर असोसिएशन पुणे यांच्यातर्फे उत्तम दत्तात्रय पोतदार यांना निवृत्त सेवा पुरस्कार श्रीक्षेत्र नर्सी नामदेव जिल्हा हिंगोली येथे सोलापूर जिल्हातून राज्य पातळीवरील सेवानिवृत्त पुरस्कार २०२४-२०२५ एन.डी. मारणे (अध्यक्ष महाराष्ट्र पेन्शनर असोशिऐशन पुणे) यांच्या हस्ते सन्मानपत्र, ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. उत्तम पोतदार यांनी महाराष्ट्र शासनाच्या सेवेतून निवृत्तीनंतरही पेन्शनर संघटनेच्या काम ासाठी आयुष्याच्या उत्तरार्धाचा आलेख आदर्श ठेवला. सेवानिवृत्तांना प्रेरित करुन संघटनेस सभासद मिळवून देण्यासह संघटन मजबुतीचे कार्य सर्वार्थाने केले. याबद्दल निवृत्त सेवा पुरस्कार मिळाला. पुरस्कार मिळाल्याबद्दल सुलाखे हायस्कूल वर्ग मित्रमंडळ तसेच सोलापूर जिल्हा पेन्शनर संघटनेच्यावतीने अभिनंदन केले आहे.




## रमाई भिमराव आंबेडकर यांना वळसंगमध्ये अभिवादन

**वळसंग, दि. ७ फेब्रुवारी-**

मातोश्री रमाई आंबेडकर यांच्या जयंती निमित्त मातोश्री रमाई आंबेडकर व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महिलांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले. यावेळी मंडळाचे म ार्गदर्शक दीपक गायकवाड, अध्यक्ष, शांतकुमार गायकवाड, उपाध्यक्ष मिथुन सोनकांबळे, करण वाघमारे, संदीप मुंगळे, बाबासाहेब कांबळे, डॉ. अजय थोरात, मेंबर सिद्धराम वाघमारे,दिनेश गायकवाड,परशू लोडेनवरु, वीर कांबळे, परशू वानखडे, राजू गायकवाड, संजय, हणमंत कसबे, भीमा वाघमारे, आकाश बलशंकर, पांडू शिवशरण, महादेव कपूरे, सौरभ गायकवाड विशाल गायकवाड, कुलदीप गायकवाड, राम शिवशरण, नामदेव गायकवाड, रमेश गायकवाड, एकनाथ वाघमारे, पिराजी जाधव, शंतनु वाघमारे, अभि कांबळे, संग्राम गायकवाड सुनील बलशंकर विशु गायकवाड यांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

## प्रा. डॉ. राहुल पालके नेट परीक्षा उत्तीर्ण

**बार्शी, दि. ७ फेब्रुवारी-**



येथील श्री शिवाजी महाविद्यालयात इंग्रजी विषयात सहाय्यक पदावर कार्यरत असणारे डॉ. राहुल भगवान पालके हे विद्यापीठ अनुदान आयोगामार्फत डिसेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत आदिवासी आणि प्रादेशिक भाषा व साहित्य या विषयात नेट परीक्षेत(राष्ट्रीय पात्रता चाचणी) उत्तीर्ण झालेले आहेत. विशेष म्हणजे ते नेट/ सेट ही परीक्षा या वेळेस २० व्यांदा उत्तीर्ण झालेले आहेत. अगोदर ते या परीक्षा इंग्रजीत ११ वेळा, मराठीत २ वेळा, हिंदीत २ वेळा, वुमेन स्टडीज, तुलनात्मक साहित्य, भाषाशास्त्र तसेच अर्थशास्त्र या विषयांत प्रत्येकी १ वेळा उत्तीर्ण झालेले आहेत. त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार विजेते अमिताव घोष यांच्या कांदबरी लेखनावरील अभ्यासासाठी पीएच.डी. ही पदवी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून प्राप्त झालेली आहे. ते गेली ११ वर्षे श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी येथे सहाय्यक प्राध्यापक अध्यापन करीत आहेत. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांची ओळख आहे. या नेट परीक्षेत त्यांना आदिवासी आणि प्रादेशिक भाषा व साहित्य या विषयात १६० गुण प्राप्त झाले असून पर्सेंटाईल स्कोर ९२.१३ असा आहे. त्यांच्या या यशात यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालयाचा सिंहाचा वाटा आहे.

# अक्कलकोट मतदारांच्या लागल्या रांगा; सत्तेत कल्याणशेट्टी का म्हेत्रे याची उत्सुकता

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ७ फेब्रुवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ६ गटासाठी व पंचायत समितीच्या १२ गणांसाठी शनिवारी दुपारी दीडपर्यंत ८२ हजार ३८५ मतदारांनी मतदान केले. त्यामुळे सरासरी ३५.६८ टक्के मतदान झाले होते. सकाळी ७.३० वा मतदानास प्रारंभ झाला. पहिल्या दोन तासात सकाळी ९.३० पर्यंत १० हजार ८७ पुरुषांनी व ६ हजार ६८० महिला मतदारांनी एकूण १६ हजार ७६७ मतदारांनी मतदान (७.२६ टक्के) केले होते. सकाळी ११.३० पर्यंत ४८ हजार ५९ मतदारांनी(सरासरी२०.८१ टक्के ) मतदान केले होते. यामध्ये २२ हजार ९१२ पुरुष व २२ हजार १४७ महिला मतदारांचा समावेश होता. दीडपर्यंत ४१ हजार ४५४ पुरुष व ४० हजार ९२८ महिला मतदारांनी मतदान केले.

**जिप गटात यांच्यात झाली लढत**

जि. प. चपळगाव गटात आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या धर्मपत्नी शांभवी कल्याणशेट्टी, शिवसेनेच्या सुजाता भरमशेट्टी ,वागदरी गटात भाजपाकडून राजश्री शेळके, शिंदे शिवसेना कडून प्रविण तानवडे, कांग्रेसकडून म ल्लीकार्जुन हत्ते, जेऊर गटात कांग्रेसकडून अश्वघोष बनसोडे, भाजपाकडून विकास बुळ्ळा, अपक्ष भुताळी कांबळे, वंचित बहुजन आघाडीकडून यशवंत इंगळे, अपक्ष सत्यम कट्टीमनी, मंगरूळ गटात राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून सुज्ञानी बनसोडे, भाजपाकडून शिवानी स्वामी, नागणसूर गटात भाजपाकडून सिद्धाराम शिवमुर्ती, शिंदे शिवसेनेकडून धनराज धनशेट्टी , रासपा संतोष शिंदे, सलगर गटात भाजपाकडून सिद्धाराम बाके, शिंदे शिवसेनेकडून माजी आमदार पुत्र शिवराज म्हेत्रे, राष्ट्रीय समाज पक्षाकडून दत्तात्रय माडकर या जिप गटातील उमेदवारासाठी मतदान झाले.

**सर्व जागा भाजपा जिंकणार : आ. सचिनद कल्याणशेट्टी**

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विकास कामांच्या जोरावर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ६ व पंचायत समितीच्या सर्व जागा भाजपा मोठ्या फरकाने जिंकणार असल्याचा दावा केला आहे.

**दुधनीतच नव्हे तालुक्याही भगवा फडकावणार : शंकर म्हेत्रे**

शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर अवघ्या पाच महिन्यात दुधनी न. पा मध्ये भगवा फडकाविला. आता तालुक्यातही शिवसेनेचा भगवा फडकवू असे दुधनी नगरपालिका विजयाचे किंगमेकर शिंदे शिवसेनेचे नेते शंकर म्हेत्रे यांनी सांगितले.

**पंचायत समिती लढत**

चप्पळगाव गणामध्ये सागर कल्याणशेट्टी (भाजपा), अश्पाक अगसापुरे (शिंदे शिवसेना), अपक्ष राजेद्र स्वामी, नितीन गजधाने (वंचित बहुजन आघाडी), कुरनुर गण विनोद मोरे (भाजपा) व्यंकट मोरे (शिंदे सेना), अमृत सोनकांबळे ( वंचित बहुजन आघाडी), रविद्र सलगरे(रासपा), वागदरी गणअप्पासाहेब किवडे (भाजपा), संजय होळे(, शिंदे शिवसेना ) नागेश घुगरे (कॉग्रेस) सोमनिंग घोडक (रासपा), शिरवळ गण राजेंद्र बंदिछोडे (भाजपा), गणेश मोरे (शिंदे शिवसेना), अर्जुन गायकवाड (वंचित बहुजन आघाडी), दत्तात्रय माडकर (रासपा), दहिटणे गण आशा इंगळे (भाजपा), कॉग्रेसकडून अनिता नडगम, अपक्ष फुलाबाई गायकवाड, जेऊर गणातुन मधुन भाजपाकडून पंचायत समितीचे २१८ सभापती विमल गव्हाणे, काँग्रेसकडून श्रृती पाटील, गण सुलेरजवळगेमध्ये भाजपाकडून उत्तम वाघमारे, राष्ट्रवादी कडून पऱ्हाद वाघमारे, अपक्ष सुशेकांत कांबळे, पंचायत समिती गण मंगरूळ मध्ये भाजपाकडून रश्मी हिप्परगी, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी कडून भुवनेश्वरी कौरशेट्टी, गण नागणसुर मध्ये भाजपाकडून वैष्णवी सलगरे, शिवसेनेकडून स्वाती उडचाण, पंचायत समिती गण तोळणुर मधुन भाजपाकडून सविता सोलंकर, शिंदे शिवसेनेकडून माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांची कन्या शितल म्हेत्रे, गण सलगर मधुन भाजपाकडून शिवराज बिराजदार, शिंदे शिव सेनेकडून भिमण्णा सोलापुरे, अपक्ष अशोक ढोणे, मुगळी मध्ये भाजपाकडून पंचायत समितीचे माजी सदस्य मोतीराम राठोड यांची कन्या समृद्धी राठोड शिंदे शिवसेनेकडून संगीता पाटील या उमेदवारांचे मतदान यंत्रात बंद झाले.



## कुंभारीत पोलिसांचा तगडा बंदोबस्त; मतदान प्रक्रिया शांततेत

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ७ फेब्रुवारी-**

वळसंग पोलीस ठाणे हद्दीत जिल्हा परिषद व पंचायत समि ती निवडणुकीच्या अनुषंगाने १०७ मतदान केंद्रावरती लोकांनी मतदानाचा हक्क बजावला.

वळसंग पोलीस ठाणे हद्दीतील कुंभारी येथील शाळा परिसरात मोठ्या प्रमाणावर मतदान प्रक्रिया पार पडली. या ठिकाणी २२ मतदान बूथ असून सुमारे २२ हजार मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावायचा असल्याने पोलिस प्रशासनाने अत्यंत काटेकोर नियोजन करून उत्कृष्ट व्यवस्थापन राबविले. मतदान केंद्र परिसरात बॅरिकेटिंग, प्रत्येक बूथनिहाय मतदारांसाठी वेगळे प्रवेश व निर्गमन मार्ग, स्पष्ट दिशादर्शक फलक, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच ड्रोनद्वारे व्हिडिओ शूटिंग करण्यात आले. सर्विस रोड बंद ठेवून वाहतूक नियंत्रणात ठेवण्यात आले. ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदारांसाठी इलेक्ट्रिक व्हेईकल व व्हीलचेअरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. त्यामुळे सर्व मतदारांनी अत्यंत सुव्यवस्थित, शांत व निर्भय वातावरणात मतदान केले. यशस्वी व्यवस्थापनासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक यावलकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यामावार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या नेतृत्वाखाली वळसंग चे सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल डोंगरे, इतर पोलिस अधिकारी व कर्मचारी यांनी दक्षता व शिस्तबद्ध पद्धतीने काम करून मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडली.

# अवैध दारुसह १ कोटीचा मुद्देमाल जप्त

**राज्य उत्पादन शुल्कची १८४ जणांवर कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

आचारसंहिता कालावधीत शहर-जिल्हा परिसरातील संयुक्त कारवाईत अवैध बनावट देशी, विदेशी मद्य व गोवा राज्य निर्मित विदेशी मद्य हातभट्टी दारु निर्मिती, विक्री वाहतुकीवर केलेल्या कारवाईत रूपये १ कोटी ११ लाख ५६२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. १६ जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२६ या आचासंहिता कालावधीमध्ये १९५ गुन्हे नोंद करण्यात आले असून १८४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. सदरच्या कारवाईत ६८,११० लि. रसायन, ३९५० ली. हातभट्टी दारु, ८३७ ब. लि. देशी मद्य, ४०९ ब.लि. विदेशी मद्य, १९८७ ब.ली. परराज्यातील विदेशी मद्य, १९,८०० बनावट बुचे, ८६ ब.लि. बिअर, १०१९ ली. ताडी, १०८ब.ली. वाईन, २४० किलो गुळ पावडर, तसेच ०६ चारचाकी वाहन व १४ दुचाकी वाहनांसह रूपये १ कोटी ११ लाख ५६२ चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दि. २९ जानेवारी ते ०६ फेब्रुवारी २०२६ या कालवधीमध्ये निरीक्षक भरारी पथक क्र.२ या कार्यालयाने माढा तालुक्यातील टेंभुर्णी येथे कारवाई करुन ५४० ब.लि (६० बॉक्सेस) गोवा परराज्यातील विदेशी मद्याची वाहतुक करणाऱ्या एक चारचाकी वाहनासह रुपये १६,७०,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एक आरोपी अमोल वसंत खटके (रा. तांबवे ता. माढा) यास अटक करण्यात आली आहे. निरीक्षक कुडुवाडी विभाग सोलापूर या कार्यालयाने बार्शी तालुक्यातील मौजे शेळगाव येथे अवैध गोवा परराज्यातील २२५ ब.ली. (१६ बॉक्सेस) विदेशी मद्य तसेच २००० बनावट बुचे ईत्यादीची वाहतुक करणाऱ्या एक चारचाकी वाहनासह एकुण रुपये ५,७४,०००/ चा म ुद्देमाल जप्त करण्यात आला असुन एक आरोपीस अटक करण्यात आली आहे. या विभागाकडुन अवैध मद्य विक्री करणाऱ्या व मद्य पिण्यास परवानगी देणा-या एकूण ६ ढाब्यांवर गुन्हे नोंदविण्यात आले असून १८ आरोपींवर कारवाई करण्यात आलेली आहे.



## आराम बाग नाटकाने प्रेक्षकांची मने जिंकली: गौहर हसन

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोशल कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सने आयोजित केलेल्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभामध्ये ॲक्ट ग्रुप सोलापूरचे प्रसिद्ध नाटक आराम बाग सादर करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूरचे पोलिस उपायुक्त गौहर हसन आणि अध्यक्षस्थानी सोलापूर सोशल असोसिएशनचे अध्यक्ष अखलाक वाडवान उपस्थित होते. हे नाटक सय्यद इक्बाल यांनी दिग्दर्शित केले असून याचे लेखक आफताब हसनैन आहे. या नाटकात अभिनेता अशफाक सातखेड (आफताब हसनैन), ह्युम कुरेशी (जहेन), वसीम शाहबाद (जिहादी), नदीम शेख (लिंबुवाला), सुफयान शाहपुरे (बेदीन) तर रियाज अंबिलखिचडे (दिनदार) ह्या भूमिका साकारल्या आहेत, ज्यामुळे प्रेक्षकांची प्रशंसा झाली आहे. या नाटकाचे संगीत सय्यद मुहाफिज तर प्रकाशयोजना सय्यद सफदर अली यांनी केली आहे. लचकरच ॲक्ट ग्रुप प्रेक्षकांसमोर दोन नवीन नाटके सादर करणार आहे.



## पालिका आयुक्त सचिन ओंबासेंकडून समर्थ प्रसाद प्रकल्पाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त सचिन ओंबासे यांनी क्रीडाईच्या प्रदर्शनात समर्थ प्रसाद प्रकल्पाचे कौतुक करून त्यांनी बेल वाजून प्रकल्पाचे खूप मोठ्या प्रम ाणात कौतुक केलं की अत्याधुनिक पद्धतीच्या इंजिनिअरिंगने नटलेल्या या प्रकल्पाचे त्यांनी कौतुक केले.

माझी कलेक्टर व मुख्यमंत्र्यांचे प्रमुख सल्लागार प्रवीण सिंह परदेशी यांनी समर्थ प्रसाद प्रकल्पाचे कौतुक केले आणि मार्गदर्शनही केले की असा प्रोजेक्ट सोलापुरात येणे म्हणजे सोलापूरला अभिम ानास्पद आहे कारण देशभरातील नावाजलेल्या इंजिनिअरिंगच्या माध्यमातून समर्थ प्रसाद प्रकल्पाचे प्रोजेक्ट तयार होणार आहे त्यामुळे सोलापूर साठी हे अभिमानास्पद असून या प्रकल्पात फ्लॅट असणे म्हणजे नागरिकांसाठी गौरवास्पद असल्याचे स्पष्ट केले.

## राजर्षी शाहू लॉ कॉलेजमध्ये रक्तदान शिबीर संपन्न

**डॉ. जगदाळे मामांच्या जयंतीनिमित्त आयोजन**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. ७ फेब्रुवारी-**

येथील राजर्षी शाहू लॉ कॉलेजमध्ये कर्मवीर डॉ. माम ासाहेब जगदाळे यांच्या १२३ व्या जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबीर आयोजन करण्यात आले, शिबिराचे उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे यांच्या उपस्थितीमध्ये झाले , म हाविद्यालयातील विविध विभागाम धील बहुसंख्य मुले व मुली यांनी यामध्ये सहभाग नोंदवला. तसेच महाविद्यालयातील आय.क्यू. एस.सी. समन्वयक प्रा. शिखारे मॅडम, प्रा. तायडे, कृष्णा सातपुते, कोल्हे यांनी सुद्धा रक्तदान केले. रक्तदान शिबीर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक डॉ. दत्तप्रसाद प्रेमलता मनोहर सोनटक्के, प्रा.खोत, प्रा. वडने, प्रा. काळे, प्रा. शेख, प्रा.पाटील, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा. मिठा, प्रा. कुलकर्णी, प्रा. सुरवसे, प्रा.साखरे, प्रा. हरदडे, गव्हाणे, वाघे, शेळके, माने व ठोंबरे यांनी परिश्रम घेतले.



## नालंदा नगर बुद्ध विहार येथे माता रमाई यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरातील सुप्रसिद्ध अश्या नालंदा नगर बुद्ध विहार येथे त्यागमूर्ती माता रमाई यांची जयंती साजरी झाली. कार्यकामाच्या प्रमुख स्थानी सोलापूर महानगरपालिका नूतन उपमाहापौर ज्ञानेश्वरी देवकर, प्रभाग २३ अ चे नूतन नगरसेवक सत्यजित वाघमोडे तसेच महेश देवकर हे उपस्थित होते. सदर कार्यकमाला सुशिलचंद्र भालशंकर, विजयकुमार क्षीरसागर, अश्वजित दुपारगुडे, नागोराव कांबळे, चंद्रकांत मागाडे, रामचंद्र बनसोडे, बाळासाहेब सुतकर, सिद्धार्थ सिद्धगणे, नितीन माने, अनुप गायकवाड, अतुल वाघमारे, अभिषेक गायकवाड, वैभव कांबळे, सुशिल घोडके, प्रसन्न शिवशरण,प्रथमेश भालेकर, प्रतीक भालेकर, प्रज्वल प्रसन्न, महादेवी दुपारगुडे, मगर उपस्थित होते.

## सिद्धेश्वर मंडळाच्या वास्तुकला महाविद्यालयात शैक्षणिक प्रदर्शनाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

श्री सिद्धेश्वर शिक्षण मंडळ संचलित पदवी व पदविका वास्तुकला महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्जनशील कल्पनांना आणि शैक्षणिक गुणवत्तेला व्यासपीठ देणारे भव्य शैक्षणिक प्रदर्शन दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत सर्व नागरिकांसाठी खुले असलेले हे प्रदर्शन वास्तुकलेतील नवोन्मेष, सौंदर्यदृष्टी आणि सामाजिक जाणिवेचे प्रभावी दर्शन घडवणारे ठरत आहे.

प्रदर्शनाचे उद्घाटन INTCH सोलापूरचे संयोजक व अध्यक्ष डॉ. नरेंद्र काटीकर तसेच शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, सोलापूरचे प्राचार्य डॉ. संदीप नरोटे यांच्या हस्ते पार पडले. उद्घाटनप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड. सिद्राम पाटील, सचिव डॉ. शशिकांत हलकुडे, संस्थेचे विश्वस्त, महाविद्यालयाचे प्राचार्य आर्कि. निरंजन संगावार यांच्यासह विश्वस्त म ान्यवरांची उपस्थिती लाभली. प्रदर्शनात पदवी व पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाविन्यपूर्ण वास्तुरचना, कल्पक मॉडेल्स, शाश्वत विकासाभिमुख प्रकल्प आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केलेली सादरीकरणे विशेष लक्षवेधी ठरत आहेत. शहरी नियोजन, पर्यावरणपूरक बांधकाम, सामाजिक गरजांशी सुसंगत वास्तु संकल्पना यांचे प्रभावी प्रतिबिंब या प्रदर्शनात पाहायला मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासपूर्ण दृष्टिकोनासोबतच त्यांच्या कल्पनाशक्तीची उंचीही या माध्यम ातून अधोरेखित होत आहे. उजनी कॉलनी, टीव्ही टॉवर मागे, कुमठा नाका, सोलापूर येथील महाविद्यालयाच्या प्रशस्त इमारतीत हे प्रदर्शन भरविण्यात आले असून वास्तुकलेच्या विद्यार्थ्यांबरोबरच सामान्य नागरिक, पालक, अभियंते व वास्तुविशारदांसाठीही हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरणारे आहे. प्रदर्शनास जास्तीत जास्त नागरिकांनी आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य आर्कि. निरंजन संगावार यांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणारे आणि भविष्यातील वास्तुकलेची दिशा अधोरेखित करणारे हे प्रदर्शन सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्रात एक म हत्त्वाचा ठसा उमटवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# चबुतऱ्यासोबतच बसवण्णांचा पुतळा दुरुस्तीदेखील सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

शहर जिल्ह्यातील बसव प्रेमींनी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण केल्यानंतर ज्या पद्धतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याचे काम सुरू करण्यात आले. त्याचबरोबर पुतळा दुरुस्तीचे देखील काम सुरू करण्यात आल्याची माहिती

> पुतळा मे महिन्यात आमच्या स्टुडिओमध्ये आणण्यात आला होता. आम्ही त्याचे काम सुरू केले आहे. दिड महिन्याच्या आत आम्ही तो पुतळा दुरुस्ती आणि रंगरंगोटी करून चबुतऱ्यावर स्थापन करणार आहोत. तिथे पुतळा १९८२ साली स्थापन करताना ज्या स्थितीत होता त्या स्थितीत दिसेल.
>
> **- महेश शहाणे, मूर्तिकार**



शहर-जिल्ह्यातील बसवप्रेमींनी त्या कामाची काल शनिवारी अचानक जाऊन पाहणी केली तेंव्हा समजली.

मात्र काल शनिवारी बसव प्रेमींनी अचानक त्यांच्या स्टुडिओला भेट दिली. तेव्हा पुतळ्याच्या दुरुस्तीला प्रारंभ झालेला दिसून आला. यंत्राच्या साह्याने पुतळ्यावर जमलेला रंगांचा थर हटवण्याचे काम सुरू होते. यावेळी बसव ब्रिगेडचे अध्यक्ष अमित रोडगे, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, वीरशैव व्हिजन उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, बसव ब्रिगेड शहर सचिव राहुल जत्ती, सहसचिव अविनाश बिराजदार, लक्ष्मीकांत बिराजदार, मल्लाडे, अभिषेक पाटील उपस्थित होते.



## उमाबाई श्राविका विद्यालयात माता रमाबाई आंबेडकर यांची जयंती साजरी

**सोलापूर, दि. ७ फेब्रुवारी-**

सोलापूर येथील श्राविका संस्थानगर स्थित उमाबाई श्राविका विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. प्रारंभी त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार प्रशालेचे मुख्याध्यापक सुकुमार म ोहोळे, वरिष्ठ दीप्ती शहा, उपमुख्याध्यापिका अश्विनी पंडित, पर्यवेक्षक बाळासाहेब पौळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख माधवी खोत यांच्या हस्ते अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रशालेतील सहशिक्षक वैभव बारडकर यांनी रमाबाई आंबेडकर यांच्या जीवन चरित्राची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सूत्रसंचालन सहशिक्षक अनुप कस्तुरे यांनी तर आभार माधवी खोत यांनी मानले.



# जिल्हा परिषद व पंचायत समितीची रणधुमाळी



## उत्सव लोकशाहीचा



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट तालुक्यातील हन्नूर येथील जिल्हा परिषद शाळेत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी धर्मपत्नी शांभवी कल्याणशेट्टी समवेत मतदानाचा हक्क बजावला.



करमाळ्याचे माजी आ. संजयमामा शिंदे यांनी निमगाव टें येथे पत्नी सविता शिंदे, सुन गारगी शिंदे नात तुळजाई शिंदे यांच्यासह मतदानाचा हक्क बजावला. यावेळी आकोले खु.गणाचे उमेद्वार संभाजी उर्फ गोटू पाटील उपस्थीत होते.



उमरड (ता.करमाळा) : येथे आपल्या वृद्ध मातेला मतदानासाठी घेऊन जाताना मुलगा रसूल व माता जैतूनबी शेख.



करमाळ्याचे आमदार नारायण (आबा) पाटील



जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार



करमाळा मा.सभापती अतुल पाटील




जिल्हा परिषदेचे सदस्य चंद्रकांत सरडे



११० वर्षीय धोंडाप्पा बाबू टेकनर (रा. वाणीचिंचाळे, ता.सांगोला)



मंद्रूप : येथील दिव्यांग निलेश होळकर यांना मतदान केंद्राकडे घेऊन जाताना शिवा माळी.

# ज्येष्ठांसह युवकांमध्ये मतदानाचा उत्साह; सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या रांगा







**नेत्यांनी बजाविला मतदानाचा हक्क :** आमदार अभिजीत पाटील यांनी पंढरपूर तालुक्यातील देगाव या आपल्या गावी मतदानाचा हक्क बजाविला. तर कल्याणराव काळे यांनी आपल्या आईसमवेत संपुर्ण कुटुंबियासह वाडीकुरोली या आपल्या गावी मतदानाचा हक्क बजाविला.

**मतदानाची आकडेवारी :** मतदान प्रक्रिया सुरु झाल्या नंतर शनिवारी सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत ५.६१ टक्के इतक मतदान झालेले होते. या मध्ये १० हजार ५९० पुरुष तर ५ हजार ४४४ स्त्री मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला होता. त्या नंतर ७.३० ते ११.३० या वेळेत ५० हजार ५४१ पुरुष आणि महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला त्यामुळे मतदानाचा टक्का १७.६८ वर पोहचला होता. दुपारी दीड वाजे पर्यंत ९३ हजार ६३ मतदारांनी मतदान केल्याने ३२.५६ टक्के इतके मतदान झाले होते. पुढे दुपारी साडेतीन वाजे पर्यंत १ लाख ३७ हजार ८९८ मतदारांनी आपला हक्क बजाविल्याने सहाजिकच ४८.२५ टक्के इतके मतदान झाले होते. त्यामुळे मतदान संपेपर्यंत साधारणपणे ५० ते ५५ टक्के इतके मतदान होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या विशेष लढती :** पंढरपूर तालुक्यातील वाखरी गटातून भाजपकडून मोनिका काळे तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून मयुरी बागल यांनी एकमेकांसमोर आव्हान उभे केले आहे. मोनिका काळे यांच्या विजयासाठी भाजपचे माजी आमदार प्रशांत परिचारक, कल्याणराव काळे यांनी या ठिकाणी ताकत पणाला लावली होती. तर मयुरी बागल यांच्या विजयासाठी आमदार अभिजित पाटील यांनी सर्वस्व पणाला लावल्याचे दिसुन आले. गोपाळपूर गटात भाजपकडून दुर्गा अंकुशराव यांनी तगडे आव्हान तयार केले असून शिवसेना शिंदे गटाच्या प्रियांका अशोक परांडे यांनी सुध्दा प्रचारात चांगली मुसंडी घेतली होती.त्यामुळे या लढतीकडे देखील सर्वांचे लक्ष लागलेले आहे. कासेगाव गटात भाजपचे हरी गावंधरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संजय वाघमारे व तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे व्यंकटराव भालके अशी लढत झाली आहे. त्यामुळे या लढती मध्ये कोण बाजी मारणार याबद्दल देखील उत्सुकता आहे. करकंब व भोसे गटातसुद्धा एकास एक उमेदवार असून भाजप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी याठिकाणी विशेष लक्ष केंद्रित केले होते त्यामुळे विजयश्री कुणाच्या गळ्यात पडणार याची उत्सुकता आहे.

**आदर्श मतदान केंद्रावर उत्साह :** तालुक्यात वाखरी येथे मतदान केंद्र क्रमांक १५८ आदर्श महिला मतदान केंद्र तर टाकळी येथील मतदान केंद्र क्रमांक २४० येथे आदर्श मतदान केंद्राची स्थापन करण्यात आली होती. या मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी मतदारांचा विशेष उत्साह दिसून आले. या बरोबरच कासेगाव येथील मतदान केंद्र क्रमांक २८५ (निकम वस्ती) हे मतदान केंद्र संवेदनशील मतदान केंद्र म्हणून जाहीर करण्यात आलेले होते मात्र त्या ठिकाणी देखील आज मतदान प्रक्रिया शांततेमध्ये पार पडली.

**तालुक्यातील गट आणि गणांची नावे :** तालुक्यातील करकंब, भोसे,रोपळे, गोपाळपूर, वाखरी, भाळवणी, लक्ष्मीटाकळी, आणि कासेगांव हे जिल्हा परिषदेचे आठ गट तर उंबरे, करकंब, भोसे, गुरसाळे, रोपळे, सुस्ते,पुळुज,गोपाळपूर,वाखरी,पटवर्धनकुरोली, भाळवणी, पळशी, लक्ष्मीटाकळी, खर्डी, कासेगांव आणि सरकोली असे पंचायत समितीचे सोळा गण आहेत.

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.७ फेब्रुवारी -**

पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या आठ तर पंचायत समितीच्या सोळा जागांसाठी मतदान प्रक्रिया शनिवारी (दि.७) शांततेत पार पडली. जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी निवडणूक रिंगणातील ७० उमेदवारांचे भवितव्य आज मतदानयंत्रात बंद झाले.

तालुक्यात दोन लाख ८५ हजार ८२७ एकुण मतदारांपैकी सुमारे ५७ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क आज बजावला. विशेष म्हणजे करकंब मध्ये मतदान केंद्रावर आमदार अभिजीत पाटील यांचे बंधु ॲड.अमर पाटील आणि भाजपा उमेदवार यांच्या मध्ये तु.,तु,,मै,,मै,,चा किरकोळ प्रकार वगळता कुठेही अनुचित प्रकार घडला



नाही. पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या आठ गटांतून ४६ तर पंचायत समितीच्या १६ गणांमधून ७० उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. या उमेदवारांचे भवितव्य आज मतदाना नंतर मतदान यंत्रात सिलबंद झाले आहे. येत्या ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी नंतरच या सर्वांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. दरम्यान जिल्हा परिषदेच्या आठ गटांसाठी तर पंचायत समितीच्या सोळा गणांसाठी मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. सकाळी साडेसात वाजता मतदानास सुरु झाली. सकाळ पासूनच म तदानास शांततेत सुरुवात झाली. वाड्यावस्त्यांवर मतदारांचा मतदानासाठीचा उत्साह दिसत होता. शेतातील दिवसभराची कामे संपल्या नंतर अनेक मतदान केंद्रावर सायंकाळी पाच नंतर मतदारांनी मतदानासाठी गर्दी केल्याचे दिसत होते. त्यामुळे सायंकाळी उशिरा पर्यंत अनेक गावांतील मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया सुरु होती. पंढरपूर तालुक्यात यंदा जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक वेगळ्या राजकीय वळणावर लढली गेल्याचे दिसून आले. कारण पारंपारिक विरोधी गटातील नेते एका व्यासपीठावर तर चार दशकापासून एकत्र राहिलेल्या आघाडीतील नेते मात्र विरोधात प्रचार करीत असल्याचे चित्र पहायला मिळाले. विशेष म्हणजे यंदाच्या निवडणूकीत उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यावर तालुक्यात तिरंगी लढत होणार असे स्पष्ट चित्र दिसत होते. मात्र आमदार अभिजीत पाटील व विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे प्रमुख भगीरथ भालके यांनी प्रचार सुरू झाल्यानंतर युतीची घोषणा केली. त्यामुळे तालुक्यात भाजप विरुद्ध दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा), काँग्रेस व तीर्थक्षेत्र विकास आघाडी अशा लढती झाल्या.

## अकलूजमध्ये मतदानाला मोठा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ७ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वजनिक निवडणुकीच्या मतदानासाठी आज संग्रामनगर जिल्हा परिषद गट व यशवंतनगर पंचायत समिती गण येथे मतदारांत उत्साह निर्माण झाला होता. यशवंतनगर येथे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, खा. धैर्यशील मोहिते-पाटील, उमेदवार अर्जुनसिंह मोहिते-पाटील व वैष्णवी देवी मोहिते-पाटील यांनी मोहिते वस्तीवरील जिल्हा परिषद शाळेमध्ये आपला मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी साडेसात वाजता मतदानास सुरुवात झाली. सकाळी दहा वाजेपर्यंत गर्दी कमी होती. नंतर ग्रुपने मतदार मतदानासाठी येताना दिसत होते. दुपारी बारा वाजेपर्यंत सरासरी ३० टक्के पर्यंत मतदान झाले होते. संग्रामनगर येथे पंचायत समिती गणाचे उमेदवार राजेश्वरी कृष्णराव माने-पाटील व निशा किशोर गिरमे या उमेदवारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. पाटील वस्ती येथील कृष्णानंद विद्यालय येथील ९१ वर्षे वयाच्या गोदाबाई विश्वंभर लोखंडे यांनी आपल्या मुलाच्या व सूनेच्या मदतीने मतदान केंद्रावर येऊन मतदान केले. दैनिक तरुण भारतचे प्रतिनिधी चंद्रकांत कुंभार व त्यांच्या पत्नी शामा कुंभार यांनी मतदानाचा हक्क बजावला. दुपारनंतर मतदान केंद्रावर गर्दी वाढत चालल्याचे चित्र सर्व केंद्रावर होते.















नान्नज : मतदान केंद्रावर महिला बीएलओ टेबल.



कारंबा : येथे एकाच कुटुंबातील या सदस्यांनी मतदान केले.



वडाळा (ता.उत्तर सोलापूर) : येथील मतदान केंद्रावरील रांग.



नान्नज (ता. उत्तर सोलापूर) : येथील मतदान केंद्रावरील पुरुष व महिला मतदारांची रांग.



कारंबा (ता. उत्तर सोलापूर) : येथील मतदान केंद्रावर युवकांनी उत्साहाने मतदान केले.



वडाळा (ता.उत्तर सोलापूर) : येथील मतदान केंद्रावरील महिला व पुरुषांची रांग.